## स्व.निर्धन पाटील वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय येथे शिक्षक दिन साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**लाखनी दि.०९सप्टेंबर:** लक्ष्मी शिक्षण संस्था व क्रीडा मंडळ केसलवाड/ वाघ द्वारा संचालित स्व. निर्धन पाटील वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय मुरमाडी/तुपकर येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य प्रा. विशाल गजभिये यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. भेदराज ढवळे, अमर जांभुळकर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



## ११ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषदेत अनुकंपा नियुक्तीसाठी मेळावा

**प्रतिनिधी**

**भंडारा, दि. ९:** जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचा ?यांच्या कुटुंबातील पात्र सदस्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळवून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने पुढाकार घेतला आहे. अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची प्रतिक्षा सूची अद्ययावत करण्यात आली असून ती ८ सप्टेंबर २०२५ रोजी zpbhandara.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांसाठी ११ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद, भंडारा येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व पात्र उमेदवारांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद ,भंडारा यांनी केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने भव्य जनसुनावणी आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०९सप्टेंबर:** शहरातील नागरिकांच्या ज्वलंत समस्या, नगरपरिषद प्रशासना कडून होत असलेले दुर्लक्ष तसेच नागरिकांना मूलभूत सुविधा न मिळाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने भव्य जनसुनावणी आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

हे आंदोलन दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी बुधवारी दुपारी ११.०० वाजता नगरपरिषद, भंडारा येथे पार पडणार आहे. शहरातील पाणीटंचाई, गटार व सांडपाणी व्यवस्थापन, रस्त्यांची दुरवस्था, नाली सफाईचा अभाव,



कचरा संकलनातील अकार्यक्षमता, रस्ते वीज व इंटरनेट तारा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, शासकीय कामकाजातील दिरंगाई अशा अनेक समस्या नागरिकांना भेडसावत आहेत.

या सर्व प्रश्नांवर जनतेच्या थेट सहभागातून चर्चा करून उपाययोजना करण्यासाठी ही जनसुनावणी आयोजित केली आहे.

या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, उपस्थित अधिकाऱ्यांना समस्या थेट मांडण्यात येतील. भंडारा शहरातील सर्व नागरिकांनी व पदाधिकाऱ्यांनी आपल्या हक्कासाठी मोठ्या संख्येने या आंदोलनास उपस्थित राहावे, असे आवाहन चरण वाघमारे माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी केले आहे.

## ‘नमो शेतकरी योजने’चा सातवा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते वितरित

### राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८९२.६१ कोटी रुपये जमा

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०९सप्टेंबर:** ‘शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सुरू करण्यात आलेल्या नमो शेतकरी महासन्मान किसान योजनेचा सातवा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज वितरित करण्यात आला. राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण १८९२.६१ कोटी रुपये निधी मंजुर निधी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होईल.

मंत्रिमंडळ सभागृह,७ वा मजला, मंत्रालय मुंबई येथे नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा निधी वितरित करण्यासाठी कृषी विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कृषी मंत्री दत्तात्रय भरणे मंत्रीमंडळातील सदस्य,मुख्यसचिव राजेशकुमार यावेळी उपस्थित होते.

केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनाच्या धर्तीवर राज्य शासनाने ही योजना सुरू केली आहे.

यामध्ये पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देऊन शेती खर्चाला हातभार लावण्याचा उद्देश आहे. या सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या महिन्यांचे अनुदान लाभार्थ्यांना देण्यात आले.

ज्या शेतकरी लाभार्थ्यांचा



प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत समावेश आहे. त्या सर्वांना राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळाला आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर हे अनुदान शेतक-यांसाठी महत्वाचे ठरणार आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत पात्र शेतक-यांना प्रति वर्षी सहा हजार रुपये अनुदान देण्यात येते. केंद्र शासनाच्या या अनुदानामध्ये राज्य शासनातर्फे प्रति वर्षी आणखी सहा हजार अनुदान देण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविली जाते.

या दोन्ही योजनेच्या माध्यमातून लाभार्थी शेतक-यांना प्रति वर्षी बारा हजार अनुदान मिळत असते. राज्याच्या नमो शेतकरी महासन्मना योजनेअंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना आतापर्यंत एकूण सहा हप्ते देण्यात आले आहेत.

आतापर्यंत सहा हप्त्यामध्ये ९३ लाख ९ हजार शेतक-यांना ११ हजार १३० कोटी रूपये थेट लाभ हस्तांतरणाव्दारे जमा करण्यात आला आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की,’राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांना उत्पादन खर्च भागवता यावा आणि शेतीतून टिकाऊ व्हावी यासाठी ही योजना महत्त्वाची ठरत असून या योजनेद्वारे शेतकऱ्यांना प्रतिवर्षी आर्थिक मदत देण्यात येते. आतापर्यंतच्या सहा हप्त्यांमधून राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत रक्कम जमा झाली आहे. सातवा हप्ता वितरित झाल्यानंतर या लाभार्थ्यांची संख्या आणखी वाढणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट होत आहे.’

## नव्या व श्रुतीची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.०९सप्टेंबर:** क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय भंडारा व तालुका बुद्धिबळ असोसिएशन साकोली तर्फे आयोजित शालेय तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन स्थानीय तालुका क्रीडा संकुल च्या हॉलमध्ये करण्यात आले होते. १९ वर्ष मुलींच्या गटात वसंतराव नाईक विद्यालय चांदोरी येथील कु. सृष्टी हातझाडे



व कु. नव्या तांडेकर चौथा व पाचवा क्रमांक प्राप्त करून जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

विजय स्पर्धकांचे अभिनंदन संस्था अध्यक्ष विद्या कटकवार, संचालक मनोहरराव राकडे, मुख्याध्यापक आर एच हारगुडे, क्रीडा संघटक शाहेद कुरैशी, दर्शन कटकवार, अश्विनी राजूरकर, संकेत सूर्यवंशी, खीतेलेश चांदेवार, विद्यार्थी पालक यांनी केले आहे.

## पंडित जवाहरलाल नेहरू माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी दि.०९सप्टेंबर:** सानगडी येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी दिवसाच्या पहिल्या सत्रात स्वयंशासन व दुसऱ्या सत्रात डॉ. राधाकृष्णन यांच्या जयंतीचा व्यासपीठीय कार्यक्रम साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रमोद वंजारी तर प्रमुख अतिथी म्हणून संत नरहरी शिक्षण संस्था साकोली चे सदस्य प्रिती डोमळे त्याचप्रमाणे प्रमुख उपस्थितीत प्राध्या. हिरालाल मेश्राम, सहाय्यक शिक्षक राजेंद्र हर्षे, सौ. सुनीता किरणापुरे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनावर गीत, भाषण यांच्या



माध्यमातून प्रकाश टाकला व सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या स्वयंशासनात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची उत्तम भूमिका पार पाडून अध्यापनाचे काम यशस्वीरित्या पार पाडले. स्वयंशासनाचे प्राचार्य म्हणून खुशी ब्राम्हणकर व मुख्याध्यापक म्हणून विशाखा भांडारकर आणि पर्यवेक्षक म्हणून धवल शेंडे यांनी एकूण ८० विद्यार्थी शिक्षकांसह उत्तम कामगिरी पार पाडली.संचालन विशाखा भांडारकर हिने तर आभार धवल शेंडे ह्याने पार पाडले.

## जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०९सप्टेंबर:** जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई येथे होणार असून याकरीता जिल्हा, विभाग, राज्य आणि देशस्तरावर स्पर्धा घेतली जाणार असून याद्वारे गुणवान कौशल्यधारक पात्र स्पर्धक निवडले जाणार आहेत. सदर स्पर्धा दर दोन वर्षीनी होते आणि ही जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्ठता स्पर्धा असून जगभरातील २३ वर्षाखालील तरूणांकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची ही स्पर्धा ऑलपिंक खेळासारखीच आहे. या स्पर्धेमध्ये भारतातील प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने भंडारा जिल्हयातील युवक-युवतींनी विविध ५० क्षेत्रामध्ये होणाऱ्या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी स्कील इंडीय डीजीटल पोर्टलवर करावी, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त सुधाकर झळके यांनी केले आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करीता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करीता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे. सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी ५० क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी, २००४ किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे. तसेच, Digital Construction, Cloud Computing, Cyber Security, ICT Network Infrastructure, Additive Manufacturing, Industrial Design Technology, Industry 4.0, Mechatronics, Optoelectronic Technology, Robot Systems Integration, Water Technology, Dental Prosthetics, Aircraft Maintenance या क्षेत्राकरिता उमेदवारांचा जन्म दि. १ जानेवारी, २००१ किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे.

शांघाई येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन्न, कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेकरिता सर्व शासकीय आणि खाजगी औद्यौगिक प्रशिक्षण संस्था, एमएसएमई टूल रूम्स, सिपेट आयआयटी, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन महाविद्यालये, आयएचएम / हॉस्पिटेलिटी इंस्टिट्यूट, कॉर्पोरेट टेक्निकल इंस्टीट्यूट, स्किल ट्रेनिंग इंस्टीट्यूट, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एमएसबीव्हीटी, खाजगी कौशल्य विद्यापीठ, येईल. इंस्टीट्यूट ऑफ ज्वेलरी मेकिंग, इतर सर्व प्रशिक्षण संस्था, कला, वाणिज्य, विज्ञान शाखेची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तसेच, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडे अधिनस्त सर्व व्यवसायिक कौशल्य प्रशिक्षण संस्था, विविध व्यावसायिक आस्थापना आणि कारखाने यांचेकडील विहीत वयोमर्यादेतील इच्छूक प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांचे नामांकन या स्पर्धेसाठी करता येईल. तसेच, या स्पर्धेत निवड झालेल्या उमेदवारांना वेळोवेळी लागणारे मार्गदर्शन व सहाय्य महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचेकडून करण्यात यासाठी सहभाग घेण्यास इच्छुक असलेल्या पात्र उमेदवारांनी www.skillindiadigital.gov.in या लिंकवर भेट देऊन नोंदणी करून आपला सहभाग दि. ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी निश्चित करावा असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, भंडारा चे सहायक आयुक्त सुधाकार झळके यांनी केले आहे.

## शिक्षक देतात जीवनाला आकार,ज्ञानाचा आधार- धर्मेंद्र कोचे




**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.०९सप्टेंबर:** अथांग सागरात ज्ञानाचा आधार, शिक्षक देतात विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार,वाचनाची सवय रुजवितो,ज्ञानाचा दीप पेटवितो, शब्दांच्या औंजळीत जग शोधण्यासाठी प्रवृत्त करतो असे प्रतिपादन धर्मेंद्र कोचे मुख्याध्यापक जिल्हा परिषद हायस्कूल साकोली यांनी शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

विद्यार्थ्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जीवनपट उलगडला. शिक्षक दिनानिमित्त शाळेत स्वयंशासनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये ३० विद्यार्थी शिक्षकांच्या भूमिकेत होते. शालेय मंत्रिमंडळाद्वारे शिक्षकांचे ऋणनिर्देशन करण्यात आले. शिक्षकांना भेटवस्तू व श्रीफळ देवून सर्व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, लिपिक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे प्रभाविपणे कार्य केले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र कोचे प्रमुख अतिथी सुप्रिया रहांगडाले, मेघा निंबेकर,डॉ.मनोज बागडे बि. आर. चव्हाण उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक आशा चौधरी, मनोहर भैसारे, धनराज मसराम, पल्लवी शिंदे, तौफिक सय्यद, मुकेश गुरनुले, सचिन लुटे,प्रयागराज बोरकर, अमित डोये, गिरीष सोनवणे, लीना हुमणे, सौरभ मरसकोल्हे व सर्व शालेय मंत्रिमंडळातील सदस्यांनी विशेष प्रयत्न केले.

## किन्ही च्या जि.प.शाळेत जागतिक साक्षरता दिन

### *‘निरक्षरता एक शाप’ या विषयावर निबंध स्पर्धो *विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**महासागर प्रतिनिधी**

**किन्ही मोखे दि.०९सप्टेंबर:** येथील जि.प. व. प्राथ. शाळेत जागतिक साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये साक्षरता दिनाविषयी जनजागृती, मार्गदर्शन, व घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

जागतिक साक्षरता दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा किन्ही (मोखे ) येथील विद्यार्थ्यांनी साक्षरतेवर आधारित घोषवाक्य तयार करून साक्षरतेचे महत्व तसेच निरक्षरतेविरुद्धची जनजागृती मोहिमेची सुरुवात केली. त्याचप्रमाणे इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘निरक्षरता एक शाप’ या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले .

सदर स्पर्धेमध्ये तसेच घोषवाक्य लेखन स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाची सुरुवात माता शारदा आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक पडोळे यांनी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे महत्त्व याबद्दल माहिती सांगितली तसेच शाळेचे शिक्षक बनकर , स्मिता पात्रीकर , प्रमोद शेंडे , संतोष गडदे , रूपाली रुपनवर , स्वयंसेविका रीना बीसेन , मीनाक्षी क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे संचालन विषय शिक्षिका स्मिता पात्रीकर यांनी तर आभारप्रदर्शन सहा . शिक्षक संतोष गडदे यांनी केले.

## महसूल बुडविनाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

### जिल्हाधिकारी यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी दि.०९सप्टेंबर:** भंडारा जिल्ह्यातील सातही तालुक्यात घरकुल यादीत बोगस नावे घालून अवैध वाळू विक्री करून शासनाचा महसूल बुडविनाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून माजी.आ.चरण वाघमारे व आश्विन शेंडे यांनी केली आहे.

भंडारा तालुक्यात अंदाजे २५ते ३० व्यक्तींच्या नावावर बनावट रॉयल्टी वितरित करून वाळूची उचल करून शासनाचा लाखोंचा महसूल बुडवण्यात आला आहे . जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात हा प्रकार सुरू असल्याने सर्व तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांची यादी व त्यांच्या नावावर केलेली वाळूची उचल याबद्दल चौकशी करण्यात यावी. अश्विन मधुकर शेंडे हे वरठी येथील रहिवासी असून दोन महिन्यांपूर्वी भंडारा तहसील कार्यालयातील घरकुल लाभार्थ्यांच्या यादीत शेंडे यांचे नाव घरकुलच्या यादीत नसतानाही समाविष्ट करण्यात आले , एवढेच नाही तर त्यांच्या नावावर रॉयल्टी वितरित करून वाळूची उचल करण्यात आली व त्यानंतर हि वाळू बेकायदेशीरपणे विक्री करण्यात आली या प्रकरणाची तक्रार तहसीलदार भंडारा तसेच जिल्हाधिकारी यांना करण्यात आली. मात्र दोन महिने लोटूनही या प्रकरणात तहसील कार्यालयातून माहिती देण्यास तसेच कारवाई



करण्यास टाळाटाळ करण्यात आली . अखेर जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानंतर दोन जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले त्यातील एक तहसील कार्यालयातील कर्मचारी असून दुसरा ट्रकचालक आहे मात्र या प्रकरणाला अजूनही गांभीर्याने न घेता ही थातूरमातूर कारवाही करण्यात आली या प्रकरणात आणखीन मोठे अधिकारी गुंतलेले असून तेच कर्मचाऱ्यांना अभय देत असल्याचा आरोप शेंडे यांनी निवेदनातून केला आहे . या प्रकरणात कुठेतरी पाणी मुरत असल्याचा संशय बळवल्याने शेंडे यांनी पंचायत समिती भंडारा येथून घरकुल लाभार्थ्यांची यादी माहितीच्या अधिकारात मागवली त्यानंतर महसूल विभागातून घरकुलच्या नावावर वाळूची उचल केलेल्या लाभार्थ्यांची यादी मागवली या दोन्ही याद्यांची तपासणी केली असता यामध्ये तफावत आढळून आली . भंडारा तालुक्यातील मंजूर घरकुल लाभार्थ्यांच्या यादीतील अंदाजे २५ ते ३० लाभार्थ्यांची नावे पंचायत समितीच्या यादीत नसून महसूलच्या यादीत आहेत या व्यक्तींच्या नावावर घरकुलाच्या वाळूची उचल करण्यात आली असून त्याची बेकायदेशीर विक्रीही करण्यात आली आहे. अशाप्रकारे जर मोठ्या प्रमाणात बोगस घरकुल लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांच्या नावे रॉयल्टी वितरित करून वाळूची उचल केली जात असेल तर संबंधित तहसील कार्यालयातील कर्मचारी आणि अधिकारी यांना यासाठी जबाबदार का धरण्यात येऊ नये ? शासनाचा लाखोंचा महसूल बुडवणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच जिल्ह्यातील सातही तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांची यादी आणि त्यांच्या नावावर वाळूची झालेली उचल यासंदर्भातील माहिती प्राप्त करून देण्यात यावी तसेच यात घोळ आढळल्यास सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनातून केली आहे.

## पालकमंत्री जनता दरबारास जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### तहसील कार्यालय येथे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.०९सप्टेंबर:** पालकमंत्री जनता दरबारात समस्यांचे निराकरण करण्यात येईल तसेच आजच्या पहिल्या जनता दरबारात आलेल्या काही तक्रारींचे निराकरण सुद्धा करण्यात आले व उर्वरित तक्रारींच्या चौकशी लावून संबंधित विभागाकडे पाठवून यांचे निराकरण करण्यात येईल अशी माहिती उपविभागीय अधिकारी स्वाती देसाई यांनी दिली .

तसेच याप्रसंगी साकोली चे तहसीलदार निलेश कदम यांनी सर्वांच्या समस्यांचे निराकरणासाठी संबंध संबंधित विभागाकडून याची माहिती अर्जदाराला देण्यात येईल. पालकमंत्री यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात जनता दरबार चे आयोजन करण्याचे निर्देश दिले होते.




आज साकोली येथील तहसील कार्यालयात जनता दरबाच्या आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी तालुक्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार निलेश कदम, पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर ,होमगार्ड समादेशक अधिकारी राजेश बैस, खंडविकास अधिकारी पुंडलिक जाधव, भूमी अभिलेखचे उप अधीक्षक अनिल फुलझले तथा पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी, नगरपरिषदेचे अधिकारी, वन विभागाचे अधिकारी, तसेच राजकीय पक्षाच्या वतीने नितीन खेडीकर, प्रदीप गोमासे, माजी जिल्हा परिषद सदस्य माहेश्वरी नेवारे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश राणा मेषराम, व्यंकटेश येवले, डाकराम कापगते तसेच मोठ्या संख्येने तालुक्यातील नागरिक उपस्थित होते .तसेच दर सोमवारी भरणाऱ्या पालकमंत्री जनता दरबारात ज्यांना कुणाला आपल्या तक्रारी द्यायच्या असतील त्यांनी कार्यालयीन वेळात तहसील कार्यालय येथे आणून द्यावी व सोमवारच्या दिवशी निर्धारित वेळेपूर्वी तक्रारी नोंदविल्यास त्यांना वेळेवर टोकन सुद्धा देण्यात येईल व त्यांच्या समस्यांच्या निराकरण करण्याच्या प्रयत्न या जनता दरबाराच्या माध्यमाने करण्यात येईल अशी माहिती साकोलीचे तहसीलदार निलेश कदम यांनी दिली.

# आपले सरकार केंद्र चालकांनी १२ संप्टेबरपर्यत अर्ज करावे-आधार नोंदणी संच वितरण

## महत्त्वाची सूचना

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.०८सप्टेंबर:** माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडून भंडारा जिल्ह्याकरिता आधार नोंदणी संच प्राप्त झाले असून त्या आधार नोंदणी संचाचे वाटप करावयाचे आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यातील महसुल मंडळात ज्या ठिकाणी आधार केंद्र नाही आधार केंद्र सुरु करण्याचे निर्देश शासनाकडून प्राप्त आहेत. त्यानुसार भंडारा जिल्ह्यातील रिक्त महसूल मंडळामध्ये आधार संच वितरण करण्यात येणार आहे.

या संदर्भात पात्र आपले सरकार केंद्र चालकांनी जिल्हाधिकार अधिकृत वेबसाइट www.bhandara.gov.in वर जाऊन अर्जाचा नमुना, पात्रतेचे निकष, रिक्त महसुल आवश्यक अधिक माहिती डाउनलोड करून घ्यावी. भंडारा जिल्ह्यातील आपले सरकार केंद्र चालकांनी अर्ज व आवश्यक कागदपत्रे १२ संप्टेबरपर्यत सायंकाळी ०६.०० वाजेपावतो https: // forms.gle/boBzJFVM या गूगल लिंक वर पाठवावे. सदर अर्ज भरण्याकरीता कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी,

तसेच आधार केंद्र नमुना अर्ज कोणत्याही कार्यालयात प्रत्यक्षरित्या (Hard-Copy) स्विकार तसेच वर नमूद केलेल्या लिंक सोडून कोणत्याही दुसऱ्या लिंक अथवा कुठेही अर्ज स्वीकारले जाणार घ्यावी. तसेच वरील कालावधीत अर्ज केलेल्या आपले सरकार सेवा केंद्राचालकाचा अर्ज सदर आधार कें निकष तपासुन निकषात बसत असणाऱ्या अर्जदाराचा अर्जावर जिल्हा सनियंत्रण समिती मार्फत निर्णय घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी कळवले आहे.

# एसटी बस वाहकावर विनयभंगाचा आरोप, पोलीसांनी सत्य परिस्थिती आणली समोर...

## एसटी बस सह तरूणी साकोली पोलीस ठाण्यात

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.०९सप्टेंबर:** बसमध्ये एकतर गर्दी, चालक व वाहक शेगाव साकोली फेरी आटोपुन पुढील फेर-करीता तयार. बसमध्ये घाई गडबडीत प्रवाशांना लवकर बसविण्याच्या नादात एका मुलीला वाहकाचा नकळत स्पर्श झाला त्यावर तरूणीने संतप्त होवुन वाहकाने माझा विनयभंग केल्याचा आरोप लावीत एसटीबस सह थेट पोलीस ठाणे गाठले मात्र तिथे उपस्थित पोलीसांनी प्रवाशी व सर्वसामान्य जनतेच्या माध्यमातुन या विषयाची सविस्तर माहिती घेत सत्य स्थिती उघडकीस आणून एसटी वाहकावर खोट्या आरोपाचे प्रकरण शांत केले. ही घटना ( सोम. ०८ सप्टें.) ला सायं. ०६:४५ दरम्यान घडली.

सविस्तर की, साकोली आगाराची बस शेगाव साकोली ,साकोली बसस्थानकात दाखल झाली. यातील वाहक चालक हे लांब अंतरावरून कर्तव्य बजावुन आल्याने त्यांनासुध्दा थोडा थकवा जाणवला. बस साकोली बसस्थानकावर येताच लगेच त्यांना दूस-या साकोली बोळदे फेरीसाठी पुन्हा कर्तव्यावर हजर राहण्याच्या सुचना करण्यात आल्या. त्या बसमध्ये विद्यार्थ्यांची संख्या अधिक होती व बस प्रवाशांनी खचाखच भरली होती.

वाहक बसच्या आत चढून प्रवाशांना बसच्या मागील बाजूस जाण्याच्या सुचना करीत होते जेणेकरून पुढे अन्य प्रवाशांना पुरेशी जागा होईल. या घाई गडबडीत चुकून एका अंदाजे १९ वर्षीय मुलीला एसटी बस वाहकाचा स्पर्श झाला. मात्र त्या मुलीचा गैरस-मज झाल्याने त्या मुलीने बस वाहकावर विनयभंग केल्याचा आरोप करीत बस थेट पोलीस ठाण्यात नेली. उपस्थित सर्व प्रवाशांना मात्र यातील सत्य परिस्थितीची जाण होती. पोलीसांनी बसमध्ये जाऊन अन्य प्रवाशांची विचारपूस केली असता बस वाहकाची काही चुक नसल्याचे सत्य समोर आले.

यातच असंख्य प्रवासी जनतेच्या प्रतिक्रियांवर पोलीसांनी अखेर सत्य स्थिती समोर आणून एक खोट्या विनयभंगाच्या तक्रारीची शहानिशा करून अखेर सत्य स्थिती उघडकीस आणली.

याप्रसंगी येथे राज्य परिवहन महामंडळाचे असंख्य कर्मचारी दाखल झाले होते. आरोप करण्यात



आलेले वाहक चालक हे कर्तव्यदक्ष असून कुटुंब परीवारातील दक्ष व सज्जन व्यक्ती असल्याचे सांगण्यात येते. दरम्यान साकोली पोलीस ठाणे समोर उपस्थित जनतेने सुद्धा अश्या कर्तव्यदक्ष आणि अहोरात्र प्रवाश- ांसाठी राबणा-या कर्तव्यदक्ष वाहक चालकांवर बिनबुडाचे खोटे आरोप लावू नये अशी मागणी लावुन धरली. अखेर पोलीसांनी सर्वांना शांत करीत प्रकरणाचा निर्वाळा केला.

# सोंनी - लाखांदुर मार्गावर अवैद्य दारू विक्री व्यवसाय फोफावला.

***परवानाधारक दुकाने कोमात, अवैद्य दुकाने जोमात. * आंतर तालुक्यातून होतोय अवैद्य दारू विक्रेत्यांना पुरवठा.**

**महासागर प्रतिनिधी**
**लाखांदूर दि.०९सप्टेंबर:** येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वडसा ते साकोली महामार्गावर सोनी ते चप्राड पहाडी परीसरात अवैध देशी दारू विक्रेत्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली असून, परवानाधारक दारू दुकानांमध्ये ग्राहक कमी होत चालले आहेत.

परवानाधारक दारू व्यवसायिकांवर मोठा परिणाम झाला असून, या अवैध विक्रेत्यांच्या वाढत्या संख्येमुळे शासनाचा महसूल बुडून, अवैध धंद्यांना प्रोत्साहन मिळत चालले आहे. मात्र या अवैद्य दारू विक्री करणाऱ्यांवर संबंधित प्रशासनाकडून कारवाईसाठी ठोस पाऊले उचलली जात नसल्याने त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

लाखांदुर पोलीस स्टेशन हद्दीत स्थानिक लाखांदुर येथे चार, भागडी १, डोकेसरांडी १, मासळ १ अशी सात परवानाधारक देशी दारूची दुकाने आहेत. मात्र देशी दारू दुकान परीसरात अवैद्य देशी दारू विक्री होत आहे. भागडी, मासळ व डोकेसरांडी या तिन्ही ठिकाणी परवानाधारक दुकाने असतांना गावांमध्ये परवानाधारक दुकानाच्या किंमतीत अवैद्य दारूची विक्री केली जात असल्याने मद्यपींनी परवानाधारक दुकानांकडे पाठ फिरवीली आहे. लाखांदुर - सोनी या दरम्यानच्या मार्गावर साखर कारखाना, किरणताई अद्यापक कॉलेज, चप्राड पहाडी, चप्राड बस स्थानक, सोनी - चप्राड दरम्यानचा पुल, सोनी नाला या परीसरासह मडेघाट रोडवर देखील पहाटे चार वाजतापासून परवानाधारक दुकानांच्या किंमतीत देशी दारुची अवैद्य विक्री केली जात आहे.

परवाना देशी दारूचे दुकाने सकाळी आठ वाजता उघडली जातात. त्यामुळे मद्यपींची पाऊले अवैद्य दुकानांकडे वळत आहेत. अवैद्य विक्री करणारे पवनी, अर्जुनी/मोर, साकोली या आंतर तालुक्यासह अन्य राज्यातून देखील दारूची खरेदी करून भेसळयुक्त देशी दारूची विक्री करीत आहेत. यामुळे परवानाधारक दुकान चालकांवर फटका बसला असून, शासनाचा महसूल बुडत चालला आहे. मात्र स्थानिक पोलीस प्रशासनासह संबंधित विभाग याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे भेसळयुक्त अवैद्य दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाईची मागणी सामाजिक संस्थांकडून केली जात आहे.

# तक्रारीला १५ दिवस लोटूनही चौकशी नाही

## प्रकरण काटी येथील पांदन रस्त्याचे

**महासागर प्रतिनिधी**
**मोहाडी दि.०९सप्टेंबर:** तालुक्यातील काटी येथे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत पांदन रस्त्याच्या कामात अनियमितता झाल्याची तक्रार माजी सरपंच गुंडेराव बोंदरे आणि गावकऱ्यांनी दी.२६ ऑगस्टला जिल्हाधिकारी , मुख्य कार्यकारी अधिकारी , खंड विकास अधिकारी यांच्या कडे केली.

या तक्रारीला १५ दिवस होऊनही बोगस कामाची चौकशी केली नाही. या अधिकाऱ्यांना चौकशी करण्याचे आदेश देण्यासाठी गावकऱ्यांनी दी.८ सप्टेंबर पालकमंत्री पंकज भोयर यांना पत्र दिले . काटी येथे ग्रामपंचायतच्या वतीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत महादेव सुवासार यांच्या शेतापासून ते श्रीराम बोंदरे यांच्या शेतापर्यंत , राजेंद्र मत यांच्या शेतापासून मोहन मारबते यांच्या शेतापर्यंत , देवचंद बुधे यांच्या शेतपासून भास्कर बूधे यांच्या शेतापर्यंत , तलावाच्या पाळी पासून तानाजी ठवकर यांच्या शेतापर्यंत , निंबार्ते यांच्या घरापासून आनंदराव मुरखे यांच्या शेतापर्यंत , बाभरे यांच्या शेतापासून सुनील मते यांच्या शेतापर्यंत , भास्कर बुधे यांच्या शेतापासून राजश्री बुरडे यांच्या शेतापर्यंत , राखडे यांच्या शेतापासून मोहन मारबते यांच्या शेतापर्यंत , गणेश मते यांच्या शेतापासून राखडे यांच्या शेतापर्यंत , काटी गावापासून धुसाळा गावा पर्यंत , काटी ते वायगाव गावा पर्यंत असे नाव असलेल्या ११ पांदन रस्त्याचे थातूर मातुर खडीकरण करण्यात आले. दोन महिन्यातच या रस्त्याने चालने कठीण झाले आहे. अंदाजपत्रकाला न जुमानता बोगस



कामे झाल्याचा आरोप गावकऱ्यांनी तक्रारीत केला होता . पांदन रस्ता खडीकरणाचे एक काम २२ लक्ष रुपयाचे असून या रस्त्यावर मातीकाम करण्यात आले नाही. पातळ - पातळ मुरूम टाकून पैसे काढण्यात आले आहेत . सर्व रस्त्याचे काम हे यंत्राद्वारे करण्यात आले आहेत. अकुशल काम (मातीकाम) करण्यात आले नसतानाही या कामाचे पैसे जवळच्या मजुराच्या नावे काढण्यात आले आहेत. ग्रामपंचायत पदाधिकारी , तांत्रिक सहायक , रोजगार सेवक यांच्या आशीर्वादाने जे कामावर गेलेच नाही अशा व्यक्तींच्या नावे पैसे काढण्यात आले व त्यांना परत मागण्यात आले. ११ पांदन रस्त्याच्या कामात करोडो रुपयाचा भ्रष्टाचार झाला असल्याने तात्काळ चौकशी करण्याची मागणी ग्रा . प.सदस्य ग्यानिराम कढव , माजी सरपंच प्रतिमा राखडे , गुंडेराव बोंदरे , प्रवीण चौरे यांसह गावकऱ्यांनी तक्रारीद्वारे केली होती परंतु आहे . १५ दिवस लोटूनही प्रशासनाने अद्यापही चौकशी केली नाही .

# मुरुमच्या बेकायदेशीर उत्खननामुळे वडद टेकडी नष्ट होण्याच्या मार्गावर

***चुलबंद नदीच्या धरणावरही धोका * पत्रकार परिषदेत सामाजिक कार्यकर्त्याचा आरोप**

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.०९सप्टेंबर:** तहसीलच्या वडद साजाचे गट १७६ क्रमांकाखालील १५.४० हेक्टरवर पसरलेला संरक्षित टेकडी बेकायदेशीर वाळू उत्खनन सुरू असल्याने नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. यामुळे चुलबंद नदीवर बांधलेल्या धरणालाही धोका निर्माण झाला आहे. साकोलीचे सामाजिक कार्यकर्ते रामू लांजेवार आणि देवचंद चांदेवार यांनी महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे ही पद्धत सुरू असल्याचा आरोप केला आहे आणि यावर तात्काळ बंदी घालण्याची मागणी केली आहे.

पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले की, वडाद टेकडीवर २४ तास खडी उत्खनन सुरू आहे. खडी, गिट्टी किंवा इतर गौण खनिजांच्या उत्खननावर बंदी असूनही, तहसीलमध्ये सक्रिय असलेल्या खडी माफियांनी टेकडीचा माथा पूर्णपणे खोदला आहे, ज्यामुळे या टेकडीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.



चुलबंद नदी टेकडीपासून थोड्या अंतरावर आहे.

साकोलीतील बंधारेही धोक्यात आहेत. स्थानिक नागरिकांनी याबाबत साकोलीच्या तहसीलदारांकडे तक्रार केली आहे, परंतु त्याकडे लक्ष दिले जात नाही.अधिकारी आणि राजकीय नेत्यांच्या आशीर्वादाने आणि पटवारी आणि मुरूम माफियांच्या संगनमताने संरक्षित टेकडीतून ५० हजार ब्रास मुरूम काढून सरकारला हजारो कोटी रुपयांचा गंडा घातल्याचा आरोप त्यांनी केला. देवचंद चांदेवार यांनी १५ दिवसांपूर्वी तहसीलदारांकडे या बेकायदेशीर मुरूम उत्खननाबाबत तक्रार केली होती.परंतु, कोणतीही कारवाई झाली नाही. असे सांगण्यात आले की अलिकडेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भंडारा येथील जिल्हा दंडाधिकारी कार्यालयात बैठक बोलावली होती आणि महसूल आणि पोलिस विभागाला बेकायदेशीर गौण खनिज उत्खननावर बंदी घालण्याचे आणि त्यात सहभागी असलेल्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. असे असूनही, येथे बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन जोरात सुरू आहे. कोणतीही कारवाई न झाल्यामुळे गौण खनिज तस्करांचे धाडस वाढले आहे.

# पहिल्या पालकमंत्री जनता दरबारात पवनी तालुक्यातून सर्वाधिक ३१ निवेदने; एकूण १०२ अर्जांची नोंद

**भंडारा दि. ९ :** भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या पालकमंत्री जनता दरबार या उपक्रमाला काल, ८ सप्टेंबर रोजी शुभारंभ झाला. नागरिकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या पहिल्या जनता दरबाराला जिल्ह्यातून तब्बल १०२ निवेदने प्राप्त झाली. यामध्ये पवनी तालुक्याने आघाडी घेतली असून ३१ निवेदने प्राप्त झाली. त्यापैकी तालुका स्तरावरील २७ अर्ज, उपविभाग स्तरावरील १ अर्ज तर जिल्हा स्तरावरील ३ अर्ज नोंदविण्यात आले.

**इतर तालुक्यांतील आकडेवारी पुढीलप्रमाणे -**
**मोहाडी तालुका :** १९ अर्ज (१३ तालुका स्तरावरील, ६ जिल्हा स्तरावरील) लाखांदूर तालुका : १९ अर्ज (सर्व तालुका स्तरावरील) **भंडारा तालुका :** १४ अर्ज (११ तालुका स्तरावरील, ३ उपविभाग स्तरावरील) **तुमसर तालुका :** ९ अर्ज (७ तालुका स्तरावरील, १ उपविभाग स्तरावरील, १ जिल्हा स्तरावरील) **लाखनी तालुका :** ७ अर्ज (सर्व तालुका स्तरावरील) **साकोली तालुका :** ३ अर्ज (२ तालुका स्तरावरील, १ जिल्हा स्तरावरील) या पहिल्या जनता दरबारामुळे जिल्ह्यातील नागरिकांच्या अपेक्षांना सकारात्मक दिशा मिळाली असून, विविध स्तरांवरील अर्ज तत्काळ कार्यवाहीसाठी संबंधित यंत्रणांकडे पाठविण्यात आले आहेत. पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या सूचनांनुसार, या दरबारातून मिळालेली प्रत्येक समस्या नोंदवून जलद गतीने निराकरण करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. नुकत्याच झालेल्या दौऱ्यातही त्यांनी अधिनस्त अधिकाऱ्यांना या उपक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यास स्पष्ट सूचना दिल्या होत्या. यापुढेही दर सोमवारी तहसील स्तरावर जनता दरबार आयोजित केला जाणार असून, नागरिकांनी आपापल्या स्थानिक कार्यालयांमध्ये अर्ज दाखल करून तहसीलदारांमार्फत आपले प्रश्न मांडावेत, असे आवाहन पालकमंत्री कार्यालयाने केले आहे.


## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
## कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द धरण विभाग, वाही (पवनी)

(ई मेल: eegddwahi@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१८५-२९९१०२.
Main Portal:https://mahatenders.gov.in

**ई-निविदा सुचना क्र. ०६/गोधवि./२०२५-२६**

कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द धरण विभाग, वाही (पवनी) ह्यांचे खालील कामाकरिता सक्षम असलेल्या कंत्राटदाराकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावे. तसेच स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (लक्ष) | बयाना रक्कम (रु) | कोरे निविदा प्रपत्राची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोसीखुर्द उजवा कालव्यावरील ब-१ शाखा कालव्यावरुन निर्गमित १० थेट विमोचकाचे दुरुस्ती व मजबुतीकरणाचे बांधकाम. | रु. ६९.६७ लक्ष | रु. ६१७००/- | रु. २०००/- + जीएसटी १८% ३६०/- = २३६० | वर्ग ४ अ व त्यावरील | ०९ महिने पावसाळा धरुन |
| २ | वाही वसाहतीतील निरिक्षण कुटी व चुमरीतील संपुर्ण फर्निचर, बेड व त्यावरील गाद्या, कवर, चादरी, पडदे नव्याने लावणे व किरकोळ दुरुस्तीचे कामे करणे. | रु. ६०.८४ लक्ष | रु ६०९००/- | रु. २०००/- + जीएसटी १८% ३६०/- = २३६० | वर्ग ४ अ व त्यावरील | ०९ महिने पावसाळा धरुन |
| ३ | पवनी - कोरंभो- धरणस्थळ पोहचमार्गाचे आवश्यक दुरुस्तीचे काम. | रु. ५१.६९ लक्ष | रु. ५१७००/- | रु. २०००/- + जीएसटी १८% ३६०/- = २३६० | वर्ग ४ अ व त्यावरील | ०६ महिने पावसाळा धरुन |
| ४ | वाही वसाहतीमध्ये पाणी वापर संस्थेच्या सदस्यांना व शेतक-यांना प्रशिक्षण देण्यादृष्टीने सभागृहाचे मजबुतीकरण व सभागृहामध्ये नव्याने संगणक, प्रोजेक्टर, विद्युतीकरणाचे व आसन व्यवस्थचे काम करणे. | रु. ४४.४७ लक्ष | रु. ४४४८०/- | रु. २०००/- + जीएसटी १८% ३६०/- = २३६० | वर्ग ५ व त्यावरील | ०९ महिने पावसाळा धरुन |
| ५ | गोसीखुर्द उजवा कालव्यावरुन निर्गमित ब-१ शाखा कालव्याच्या वरील लघु कालवा आर-११ वरील गावरस्ता पुलाचे बांधकाम. | रु. ४४.८० लक्ष | रु.४४८००/- | रु. २०००/- + जीएसटी १८% ३६०/- = २३६० | वर्ग ५ व त्यावरील | ०९ महिने पावसाळा धरुन |

| | |
|---|---|
| अ) निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक ०९.०९.२०२५ वेळ १०.०० ते दिनांक १६.०९.२०२५ वेळ १७.४५ पर्यंत |
| ब) ई- निविदा सादर करावयाची अंतिम दिनांक | दिनांक १६.०९.२०२५ वेळ १७.४५ पर्यंत |
| क) ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक १७.०९.२०२५ वेळ दुपारी १२.०० वाजता |

(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल)
१) कार्यकारी अभियंता कार्यालयातुन ई- निविदा कोरी प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
२) सविस्तर ई-निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या Electronic Tender management http://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.
३) या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेशन, मोजमापे नकाशे इ. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. निविदाकार प्रत्यक्ष कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार दर भरण्यास जबाबदार राहतील आणि याकरीता कोणतेही प्रकारचे दावे निविदाकारास देय राहणार नाही.

जावक क्र. १६०० /गोधवि/निली/२०२५ दि.०२/०९/२५
DGIPR-2025-26/No.-5/C2457

कार्यकारी अभियंता,
गोसीखुर्द धरण विभाग,
वाही (पवनी)



**कोर्ट विद्यमान तहसिलवार तथा तालुका दंडाधिकारी, साकोली यांचे कार्यालय मौजा सानगडी प.ह.नं.दिनांक ८/९/२०२५**

**-जाहिरनामा-**

लालचंद ईस्तारी वासनिक रा.सानगडी ता. साकोली जि. भंडारा
विरुध्द
निबंधक/ सचिव, (जन्म-मृत्यूनोंदणी) ग्रा.पं. कार्यालय, विहीरगांव/बुराड्या

ज्याअर्थी अर्जदार लालचंद ईस्तारी वासनिक रा.सानगडी ता. साकोली जि. भंडारा येथील रहिवासी असून अर्जदार त्यांचा मुलगा नामे अनिरुध्द लालचंद वासनिक जन्म -मौजा विहीरगाव/बुराड्या ता. साकोली जि. भंडारा येथे दिनांक ०७/०७/१९७८ ला झालेला असल्याने त्यांनी ग्रा.पं. कार्यालय, विहीरगाव/बुराडया येथे जन्माची नोंद घेण्यासाठी जन्म व मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अंतर्गत कायदेशीर जम्माची नोंद घेऊन प्रमाणपत्र मिळण्याकरिता या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे .आणि ज्याअर्थी उक्त जन्माची नोंद घेऊन प्रमाणपत्र देण्याचे योजिले आहे. त्याकरीता दिनांक १२/१०/२०२५ही पेशी तारीख सुनावणीसाठी निश्चीत करण्यात आली असून सुनावणी तहसिल कार्यालय, साकोली येथे सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार आहे. त्याअर्थी याद्वारे जाहीर करण्यात येते की, ज्या कोणाचे अनिरुध्द लालचंद वासनिक रा.सानगडी याचे जन्माची नोंद मौजा विहीरगाव/बुराड्या येथील ग्रा.पं. सानगडी ता. साकोली जि. भंडारा गेथे जन्माची नोंद करण्या संबंधान कुणाची हरकत / आक्षेप सादर करावयाचे असेल तर त्यांनी स्वतः जातीने किवा अभिकर्ता यांचे मार्फत जाहीरनामा प्रकाशित होण्याचे तारखेपासून ०१ महिण्याचे आत सदर न्यायालयात हजर राहून उजर तक्रार /आक्षेप अर्ज सादर करावे. विहीत मुदतीत उजर तक्रार / आक्षेप न कळविल्यास संबंधित वरील अनिरुध्द लालचंद वासनिक रा.सानगडी ता. साकोली कि, भंडारा यांचे जन्माची नोंद घेऊन तसे प्रमाणपत्र देण्यासाठी संधितांना आदेशित करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ४/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिले.

स्थळ- साकोली — तहसिलदार तथा
दिनांक-८/९/२०२५ — तालुका दंडाधिकारी, साकोली


# दिव्यांग लाभार्थ्यांना घरपोच अन्नधान्य वितरीत

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.०९सप्टेंबर:** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा आगामी जन्मदिन दिनांक १७ सप्टेंबर, ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दिनांक ०२ ऑक्टोंबर, या कालावधीमध्ये 'सेवा पंधरवाडा' साजरा करण्याकरीता शासनाने कळविले आहे. जिल्हाधिकारी सावन कुमार यांनी दिलेल्या निर्देशानुसार 'नावीन्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत' माहे सप्टेंबर २०२५ पासुन राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांना घरपोच अन्नधान्य वितरीत करण्याचा उपक्रम भंडारा जिल्हा प्रशासनाने हाती घेतला आहे. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाव्दारे दर महिन्याच्या ७ तारखेला अन्न दिवस साजरा केला जातो .या दिवसाचे औचित्य साधून दिव्यांग लाभार्थ्यांना घरपोच धान्य वितरीत करण्याचा नावीन्यपुर्ण उपक्रम भंडारा जिल्ह्यामध्ये सुरु झाला असून सात सप्टेंबरच्याच्या अन्न दिनी भंडारा जिल्हयात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील १५९ दिव्यांग लाभार्थ्यांना घरपोच अन्नधान्य वितरीत करण्यात आले आहेत. काही दिव्यांग लाभार्थी हे अन्नधान्य उचल करण्याकरीता रास्तभाव दुकानात



जाण्यासाठी असमर्थ असल्यामुळे सदर उपक्रम भंडारा जिल्ह्यामध्ये यापुढे नेहमीसाठी सुरु राहणार आहे.तालुकानिहाय दिव्यांग लाभार्थ्यांची यादी भंडारामध्ये ३९, तुमसरमध्ये १२, मोहाडीमध्ये ३६ लाखनी, ३१ साकोली १३, लाखांदुर, १६ पवनी , १२ अश्या एकुण १५९ दिव्यांग लाभार्थ्यांना घरपोच अन्नधान्य वितरीत करण्यात आले आहे.

RNI No.-MAHAMAR-2010/35801 **महासागर भंडारा** **मालक, मुद्रक, प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक-** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबावदारी यांचेवर राहील.)

